# उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित

उल्हासनगर - ३, जि. ठाणे.

## ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

माननीय सभासद बंधू - भगिनीस सप्रेम नमस्कार वि. वि.,

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची चाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २९/०६/२०२५ रोजी **उल्हासनगर महानगरपालिका कार्यालय उल्हासनगर - ३,** येथे सकाळी ठीक ११:०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. विनोद अभिमन्यु केणे यांच्या अध्यक्षतेखाली खालील कामकाजासाठी घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थिती दर्शवुन सहकार्य करावे.

## वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय

१. दि. ३०/०६/२०२४ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे बाबत.
२. सन २०२४ - २०२५ या सहकारी वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, तेरीज पत्रक, अंतर्गत व शासकिय हिशोब तपासणीस यांजकडून तपासलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे बाबत.
३. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे बाबत.
४. सन २०२५ - २०२६ या सहकारी वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेले अंदाज पत्रक मंजूर करणे बाबत.
५. सन २०२५ - २०२६ या सहकारी वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे बाबत.
६. सन २०२५ - २०२६ या सहकारी वर्षासाठी लेखापरिक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरीक्षकांच्या शासनमान्य नामतालिकेमधून संस्थेकरीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
७. सन २०२४-२०२५ सालाचा शासकीय लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे, तो स्विकारणे तसेच सदर अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल स्विकृत करणे.
८. संचालक मंडळाने घेतलेल्या कर्जाबाबत.
९. शिफारस वजा ठरावास मान्यता देणे बाबत.
१० मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे इतर विषय.

आपला सहकारी,

**अच्युत बुधाजी सासे**

सचिव,
उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित,
उल्हासनगर - ३.

दिनांक : ०९/०६/२०२५

## विशेष सूचना

१. गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित करावी लागल्यांस ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. विषय वरीलप्रमाणेच राहतील, सदर सभेला गणपुर्तीची जरूरी राहणार नाही. (संस्थेचे उपविधी इ १-७)
२. सभासदाने उपविधी व सहकार कायद्यातील तरतुदीनुसार क्रियाशिल सभासद होण्यासाठी ५ वर्षातून एका सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणे आवश्यक आहे.
३. अहवाल, जमाखर्च, ताळेबंद या बाबत काही शंका असल्यास संस्थेच्या कार्यालयाकडे दिनांक २१/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत लेखी कळवाव्यात व लेखी अर्जाचाच वार्षिक सर्वसाधारण सभेत विचार करण्यात येईल.
४. जे सभासद ३१/०३/२०२५ रोजी संस्थेच्या पटावर आहेत त्यांची भेटवस्तु (रोख रक्कम) बँक खात्यावर वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर वर्ग करण्यात येईल.
५. सन २०२५ मध्ये इयत्ता १०वी व १२वी, डिग्री, डिप्लोमा, पदवी च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम रविवार दि. २९/०६/२०२५ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सकाळी ठिक ११.०० वा होणार आहे. त्यासाठी सभासदांच्या पाल्यांची नावे साक्षांकित गुणपत्रिकेसह संस्थेच्या कार्यालयात दि. २१/०६/२०२५ रोजी पर्यंत जमा कराव्यात.
६. संस्थेचा वार्षिक अहवाल संस्थेची वेबसाईट www.umcemp.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.